CoverageReport: TCS IT Wiz – Nagpur Edition

**Publication:**PunyaNagri
**Date:** 20/09/2014
**Edition:** Nagpur
**Page No:** 3
**Headline:**Center Point School, Katol road wins TCS IT WIZ

# सेंटर पॉईंट स्कूल 'टीसीएस आयटी चॅम्पियन'



**नागपूर** : माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात आयटी सेवा, सल्लागार व बिझनेस सोल्युशन्स सेवा प्रदान करणाऱ्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) तर्फे सिव्हिल लाईन्सस्थित वसंतराव देशपांडे सभागृहात शुक्रवारी 'आंतरशालेय आयटी क्वीझ-टीसीएस विज' स्पर्धेत सेंटर पॉईंट स्कूल काटोल रोडने 'टीसीएस आयटी चॅम्पियन' किताब पटकाविला. विजेत्या सेंटर पॉईंट स्कूल संघाने आता मेगा फायनलमध्ये नागपूर शहराचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळविला आहे. एसएफएस ज्युनिअर कॉलेज सेमिनरी हिल्स संघाने उपविजेतेपद मिळविले.

या वर्षीच्या क्षेत्रीय विजेत्या संघात अनिरुद्ध मोरारका व शॉविक डेचा, तर उपविजेत्या संघात राहुल भगत व दिनेश नायर यांचा समावेश आहे. विजेत्या संघाला आयपॅड एअर, तर उपविजेत्या संघाला आयपॅड मिनी प्रदान करण्यात आला. तसेच ६ स्पर्धकांना स्पेस पॅक, सिपर्स, इयरफोन, यूएसबी पेनड्राईव्ह, स्पीकर पुरस्कारच्या रूपात देण्यात आले. प्रमुख अतिथी टीसीएस बीपीएस सर्व्हिसेसचे उपाध्यक्ष व ग्लोबल एचआर प्रमुख रजन बंडोपाध्याय यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.